**संगमनेर नगरपालिका कला,द.ज.मालपाणी वाणिज्य आणि**
**ब.ना.सारडा विज्ञान महाविद्यालय ,संगमनेर**

**<u>परीक्षा विभाग</u>**

# अंतिम सत्र / वर्षातील विद्यार्थ्यांसाठी
# ऑफलाईन व ऑनलाईन परीक्षे बाबत महत्वाची सूचना

दि. १०/०९/२०२०

विद्यापीठ परीपत्रक **क्र.१०२/२०२०** नुसार अंतिम वर्षातील T.Y.B.A./B.Com./B.Sc./B.B.A. B.C.A./B.Sc.(Compt.Sci.)/B.C.A.(Sci.)/M.A/M.Com./M.Sc./M.C.S. या वर्गातील (Regular / Backlog) विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यासाठी विकल्प अर्ज (Option Form) ऑनलाईन भरुन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठस सादर करावयाचा आहे. सदर अर्ज सर्व विद्यार्थ्यांना अनिवार्य आहे . **Option Form** भरण्याची वेबसाईट http://sps.unipune.ac.in/app आहे. यासाठी मागिल परीक्षा अर्ज भरण्याचा लॉगिन व पासवर्ड आवश्यक आहे.

**Option Form** भरण्याची शेवटची मुदत **रविवार दिनांक - १३/०९/२०२० आहे** . या नंतर **वेबसाईट बंद होणार आहे** . संबधीत सर्व विद्यार्थ्यांनी वेळतच (Option Form) फॉर्म भरावेत अन्यथा आपणस परीक्षेस बसता येणार नाही . त्यास महाविद्यालय जबाबदार रहाणार नाही . याची संबंधीत सर्व **Final Year** च्या विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी .

(सर्व विभाग प्रमुखांनी सदर नोटीस विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून दयावी हि विनंती. )

PRINCIPAL
*Sangamner Nagarpalika Arts,*
*D. J. Malpani Commerce &*
*B. N. Sarda Science College,*
*Sangamner (M. S.)*

D/M.S.Word/Exam dept. notice file .docx

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY
(Formerly University of Pune)

समन्वय कक्ष (माध्यम)
गणेशखिंड, पुणे

Media Co-ordination Cell
Ganeshkhind, Pune-7

09 September 2020

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत अंतिम सत्र/ वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन/ऑफलाईन परीक्षांबाबतचा विकल्प अर्ज उपलब्ध

## रविवार १३ सप्टेंबर २०२० पर्यंत विकल्प अर्ज भरण्याची मुदत

**पुणे, दिनांक ९ सप्टेंबर २०२० :**

अंतिम सत्र/वर्षातील पात्र विद्यार्थ्यांसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ऑनलाईन पध्दतीने परीक्षा देण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. विद्यार्थ्यांना ऑफलाईन पध्दतीने सुद्धा परीक्षा देता येईल. याबाबत पुणे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांच्या लॉग इन आय डी वरून विकल्प अर्ज (option form) उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. विकल्प अर्ज भरण्याची मुदत रविवार १३ सप्टेंबर २०२० पर्यंत आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २८ ऑगस्ट, २०२० रोजी दिलेल्या आदेशानुसार, मा. कुलपती तथा राज्यपाल यांच्या व महाराष्ट्र शासनाने दिनांक ०३ सप्टेंबर, २०२० रोजी सूचित केल्याप्रमाणे अंतिम सत्राच्या/अंतिम वर्षाच्या सर्व अभ्यासक्रमांमधील विद्यार्थ्यांच्या नियमित व अनुशेषांतर्गत लेखी परीक्षा, तसेच प्रात्यक्षित/मौखिक/प्रकल्प/चर्चासत्रे (Seminar) या परीक्षांच्या आयोजनाबाबत अधिकार मंडळांनी मान्यता दिलेली असून, त्यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार अंतिम सत्राच्या/अंतिम वर्षाच्या सर्व अभ्यासक्रमांमधील विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे नियोजन करण्यात येत आहे.

परीक्षा विभाग
09/09

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा देशभरातील व परदेशातील नावलौकिक व प्रतिष्ठा लक्षात घेऊन या विद्यापीठांतर्गत विविध अभ्यासक्रमांसाठी इतर राज्यातील तसेच परदेशातील विद्यार्थी शिक्षण घेत असतात. पुणे, अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्यातील विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांतील अशा विद्यार्थ्यांची संख्या मोठया प्रमाणावर आहे. सध्या कोव्हीड 19 चा प्रादुर्भाव लक्षात घेता अंतिम सत्रातील/अंतिम वर्षातील परीक्षांसाठी सर्व पात्र विद्यार्थ्यांकरिता विद्यापीठाने Online पध्दतीने परीक्षा देण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. याबाबत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांच्या लॉगिन आयडीवरुन विकल्प अर्ज (Option Form) उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. या बाबतीत काही अडचणी असल्यास विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयाचे प्राचार्य तथा परीक्षा अधिकारी/विषय शिक्षक यांचेशी संपर्क साधावा.

तरी अंतिम सत्र/अंतिम वर्षातील परीक्षांसाठी सर्व पात्र विद्यार्थ्यांना विद्यापीठामार्फत आवाहन करण्यात येते की, जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी विद्यापीठाने उपलब्ध केलेल्या Online पध्दतीने परीक्षा देण्याचा अवलंब करुन परीक्षा द्यावी.

**परीक्षांबाबतचा विकल्प अर्ज विद्यार्थ्यांना पुढील लिंकवर उपलब्ध होईल :**
http://sps.unipune.ac.in/
------------------------------------------------

अंतिम सत्र/वर्षातील पात्र विद्यार्थ्यांसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ऑनलाईन पध्दतीने परीक्षा देण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. विद्यार्थ्यांना ऑफलाईन पध्दतीने सुद्धा परीक्षा देता येईल. याबाबत पुणे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांच्या लॉगिन आयडी वरून विकल्प अर्ज (option form) उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आम्ही सर्व विद्यार्थ्यांना आवाहन करतोय की, प्रतिकूल परिस्थितीमध्ये विद्यार्थ्यांनी त्यांच्या आरोग्याची सुरक्षितता धोक्यात न घालता पालकांच्या सहकार्याने त्यांनी विकल्प अर्ज भरावा. विद्यापीठाने उपलब्ध केलेल्या Online पध्दतीने परीक्षा देण्याचा अवलंब करून परीक्षा द्यावी.

**- महेश काकडे,**
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

# Instructions

## (ऑनलाईन व ऑफलाईन Option Form भरण्याची सूचना )

- **Once the response is submitted it will be taken as final decision by student.**
  **(Online पद्धतीने एकदा विद्यार्थ्यांने सादर केलेला प्रतिसाद हा विद्यार्थ्याचा अंतिम निर्णय समजण्यात येईल).**
- **Response submitted once will not be altered or modified or deleted.**
  **( सादर केलेल्या विकल्पामध्ये सुधारणा करण्याची तसेच रद्द करण्याची सुविधा उपलब्ध होणार नाही).**
- **Internet Data pack required per subject examination will be approximately 500 Mb.**
  **(ऑनलाईन पद्धतीने परीक्षा देण्यासाठी ५०० MB चा Internet Data pack प्रत्येक विषयासाठी गरजेचा असेल).**

- Students will be able to appear for on-line examination from place of his or her conveniences.(विद्यार्थ्याने त्याला त्याच्या सोयीच्या ठिकाणावरून ऑन लाईन परीक्षा देता येईल).
- Student can login the system using Laptop, PC, Tab, I-Pad and Tablet with working front camera during the scheduled time of examination.(विद्यार्थ्याच्या संगणक, लॅपटॉप इत्यादीला समोरील वेब कॅमेरा आवश्यक आहे).
- Students will get detailed procedure and instructions for examination through Student Profile system login.(विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षेसंबंधी सर्व सूचना Student Profile System या वरून डाउनलोड करावे).
- Student need to have internet data pack of 500 Mb per examination of one hour duration to complete on-line examination. Once logged in, student needs to complete the test in one hour.(एक तास होणाऱ्या ऑनलाईन परीक्षा देण्यासाठी विद्यार्थ्यांकडे ५००MB चा इंटरनेट डेटा pack आवश्यक असून. विद्यार्थ्यांनी परीक्षा १ तासात पूर्ण करणे अनिवार्य आहे).
- Facility of the mock (practice) on-line examination will be made available through student's credentials. Same credentials can be used for the actual examination process. (विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन पद्धतीच्या सराव परीक्षेचे आयोजन करण्यात येईल).
- Time table of online examination will be published on the University Web-Portal.(सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर परीक्षेचे वेळापत्रक परीक्षेपूर्वी उपलब्ध केले जाईल).